# Library & Information Centre

## GIT in NEWS

**Tarun Bharat 08-02-2016**

# जीआयटीमध्ये केमिस्ट्रीवर राष्ट्रीय परिषद

प्रतिनिधी
बेळगाव

केएलएस गोगटे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीतर्फे केमिस्ट्रीमधील नवेतंत्र या विषयावर राष्ट्रीय परिषद घेण्यात आली. देशभरातील विविध संस्थांचे १०० हून अधिक मान्यवर, विद्यार्थी तसेच केमिस्ट्री विषयातील तज्ज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राणी चन्नम्मा विद्यापीठाचे निबंधक डॉ. एस. एल. बेलगली प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कॉलेजचे प्राचार्य डॉ. ए. एस. देशपांडे अध्यक्षस्थानी होते. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने उद्‌घाटन झाले. गौरी व रम्या यांच्या स्वागतगीताने प्रारंभ झाला.

केमिस्ट्री विभाग प्रमुख आर. एम. कुलकर्णी यांनी स्वागत केले. डॉ. जे. के. कितूर यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला.



बेळगाव : डॉ. एस. एल. बेलगली दीपप्रज्वलन करताना. शेजारी प्राचार्य डॉ. ए. एस. देशपांडे, डॉ. रविराज कुलकर्णी, डॉ. एस. व्ही. दिवेकर आदी.

वेळेचे नियोजन कसे करावे आणि कठोर परिश्रम या विषयावर भर देत डॉ. बेलगली यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. देशपांडे यांनी बोलताना विज्ञानातील पायाभूत ज्ञान असल्याशिवाय संशोधन करणे अशक्य आहे, याची जाणीव करून दिली.

आयआयटी मद्रासचे डॉ. बसवराज एम. जी., आयगेटचे डॉ. संपतकुमार एरा, डॉ. एन. एच. आयाचिफ आदींनी मार्गदर्शन केले.

**पोस्टर सादरीकरण स्पर्धा**

यावेळी आयोजित पोस्टर सादरीकरण स्पर्धेत महादेव खेटगौडर, सिकंदर डी. बी., श्रीमती हिरेमठ यांनी बक्षिसे मिळविली. डॉ. एस. व्ही. दिवेकर यांनी अहवाल वाचन केले. जे. एम. कारेकर यांनी आभार सर्वांचे मानले.